आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी  ७.०० वाजता

२७ जानेवारी २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी पाण्याच्या गुणवत्तेची सातत्यानं तपासणी करण्यासाठी यंत्रणा उभारण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

- गुलेन बॅरी सिंड्रोम आजारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचं पथक पुण्यात दाखल

- शेअर बाजारात आज पुन्हा मोठी घसरण, सेन्सेक्स ७६ हजार आणि निफ्टी २३ हजारांच्या खाली

- यंदाचा जनस्थान पुरस्कार ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांना जाहीर

**आणि**

- ICC कडून जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंह आणि स्मृती मानधनाला सर्वोकृष्ट खेळाडूचा पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

राज्यातल्या नद्यांचं प्रदूषण कमी करण्यासाठी नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेची सातत्यानं तपासणी, आणि  रिअल टाईम मॉनिटिरिंग करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा उभारण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिल्या आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाच्या १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगानं आढावा बैठक झाली. या बैठकीत ते बोलत होते.  छोट्या छोट्या स्त्रोतांचं प्रदुषण कमी होण्यासाठी ग्रामीण भागात जनजागृती अभियान राबवण्याच्या

सूचना त्यांनी दिल्या. मत्स्य व्यवसाय विभागाच्या शंभर दिवसांच्या नियोजनाचा आढावाही मुख्यमंत्र्यांनी आज घेतला. गोड्या पाण्यात मासेमारी वाढवणं गरजेचं असून यासाठी धोरण निश्चित करावं, तसंच मत्स्यबीज मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होण्यासाठी धोरण तयार करावं अशा सूचना त्यांनी दिल्या. राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात पाळीव प्राण्यांसाठी रुग्णालय उभारण्याच्या सूचनाही त्यांनी पशुसंवर्धन विभागाच्या आढावा बैठकीत दिल्या. या संबंधात प्रस्ताव तयार करावा तसंच पशुसंवर्धन विभागातली रिक्त पदे भरण्यासंदर्भातही कार्यवाही पूर्ण करावी अशाही सूचना फडणवीस यांनी यावेळी दिल्या. पशुधनवाढीसाठी गायींच्या पैदासीची यंत्रणा उभारणे, **पैदासीच्या** प्रक्रियेत शेतकऱ्यांचा सहभाग घेणे, चारा व्यवस्थापन अशा विविध सूचना फडणवीस यांनी केल्या.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज २१ मोबाइल फॉरेन्सिक वाहनांंचं लोकार्पण केलं. या वाहनांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शास्त्रीय पद्धतीनं पुरावे गोळा करण्याची आणि साठवण्याची व्यवस्था असल्याचं मुख्यमंत्र्यांनी लोकार्पण सोहळ्यानंतर बोलताना सांगितलं. सबळ पुरावे नसल्यानं किंवा पुराव्यांसोबत छेडछाड झाल्यामुळे गुन्हेगार सुटण्याचं प्रमाण या वाहनांमुळे कमी होईल, असं ते म्हणाले.

राज्यात अशी एकूण २५६ फॉरेन्सिक वाहनं तयार केली जाणार आहेत. भारतीय साक्ष कायद्यानुसार गुन्ह्यातल्या पुराव्यांसाठी शास्त्रीय पद्धतीनं साक्ष

तसंच पुरावे गोळा करणं बंधनकारक आहे. या निकषांनुसार पुरावे जमा करण्यासाठी फॉरेन्सिक वाहनांचं लोकार्पण करणारं, महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे.

**<><><><><>**

पुण्यातल्या महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादन तसेच रहिवाशांचं इतर ठिकाणी पुनर्वसन करायला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. या कामांसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला असून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानं आता स्मारक विस्तारीकरणाला गती मिळणार आहे.

**<><><><><>**

गुलेन बॅरी सिंड्रोम या आजारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचं पथक पुण्यात दाखल झालं आहे. या ७ सदस्यीय पथकात राष्ट्रीय संसर्गजन्य आजार नियंत्रण संस्था, भारतीय वैद्यकीय संशोधन संस्था, तसंच राष्ट्रीय विषाणू संस्थेतल्या तज्ज्ञांचा समावेश आहे. या आजाराची लागण झालेल्या रुग्णांची संख्या आता १०१ झाली आहे. त्यातले ८१ पुणे महापालिका क्षेत्रात, १४ पिंपरी चिंचवड भागात, तर ६ इतर जिल्ह्यांमधले आहेत. याप्रकरणी २५ हजारांहून अधिक घरांची पाहणी महापालिकेनं केली आहे.

**<><><><><>**

जीबीएस आजार संसर्गजन्य नाही. मात्र प्रतिकारशक्ती कमी असलेल्या रुग्णांनी काळजी घ्यावी, असं आवाहन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे. या आजाराच्या रुग्णांवर पालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात मोफत उपचार केले जाणार आहे, तर खाजगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना पुणे महापालिका २ लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत करणार आहे, अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. तसंच, कमला नेहरू रुग्णालय आणि इतर खाजगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना इम्युनोग्लोब्युलिन हे इंजेक्शन मोफत उपलब्ध करून दिलं जाणार आहे.

**<><><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सुरू होत आहेत. या दरम्यान, जर एखाद्या विद्यार्थ्याकडे परीक्षेदरम्यान मोबाईल फोन किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरण आढळलं तर पुढची दोन वर्षं परीक्षेला बसायला बंदी घालण्यात येणार आहे. पूर्वी अशा प्रकरणांमध्ये एका वर्षासाठी बंदी घालण्याची तरतूद होती. मात्र, आता ती वाढवून दोन वर्षं केल्याची माहिती सीबीएसईच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

**<><><><><>**

एस.टी.ची भाडेवाढ रद्द करण्याची मागणी करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात आज ठिकठिकाणी चक्काजाम आंदोलन केलं. **हिंगोली** जिल्ह्यात हिंगोली

शहर, कळमनुरी, औंढा नागनाथ इथं  झालेल्या आंदोलनामुळे दुपारी १२ वाजेपर्यंत जिल्ह्यातली वाहतूक ठप्प होती. **नांदेडमध्ये** कार्यकर्त्यांनी मध्यवर्ती बस स्थानकात आंदोलन करत एस.टी. बस अडवून ठेवल्या आणि घोषणाबाजी केली. सामान्य प्रवाशांना न परवडणारी भाडेवाढ त्वरित मागे घ्यावी, अन्यथा यापेक्षा तीव्र आंदोलन करू, असा  इशारा आंदोलकांनी दिला.

**<><><><>**

जागतिक परिस्थितीमुळे देशातल्या शेअर बाजारात आज पुन्हा मोठी घसरण झाली. त्यामुळे सेन्सेक्स ७६ हजार आणि निफ्टी २३ हजारांच्या महत्त्वाच्या पातळीखाली बंद झाले. दिवसअखेर  सेन्सेक्स ८२४ अंकांनी घसरुन ७५ हजार ३६६ अंकांवर बंद झाला. निफ्टी २६३ अंकांनी कोसळून २२ हजार ८२९ अंकांवर बंद झाला. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका वगळता इतर सर्वच क्षेत्रातले समभाग घसरले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कोलंबियावर लादलेल्या निर्बंधांमुळे देशातले शेअर बाजार कोसळले.

**<><><><>**

कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे एक वर्षाआड दिला जाणारा, प्रतिष्ठेचा जनस्थान पुरस्कार, यावेळी ज्येष्ठ नाटककार सतीश वसंत आळेकर यांना जाहीर झाला आहे. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या १० मार्चला नाशिकमध्ये गुरुदक्षिणा सभागृहात या पुरस्काराचं समारंभपूर्वक वितरण केलं जाणार आहे. कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीनं आज नाशिक इथं वार्ताहर परिषदेत फाऊंडेशनचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके,

जनस्थान समितीचे अध्यक्ष विलास लोणारी, आणि ज्येष्ठ पत्रकार-लेखक कुमार केतकर, यांनी ही घोषणा केली.

<><><><><>

मराठी वाचकांना निसर्गाची, पशुपक्षांची गोडी लावणारे अरण्यमहर्षी मारुती चितमपल्ली यांना केंद्र शासनाचा पद्मश्री सन्मान जाहीर झाला. त्याविषयी आनंद व्यक्त करताना चितमपल्ली यांनी आपल्या पुढच्या कार्याविषयीही माहिती दिली.

**होल्ड बाईट - मारुती चितमपल्ली**

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यात वाळू तस्करीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या प्रांताधिकाऱ्यांवर हल्ला केल्याप्रकरणी तीन आरोपींना सत्र न्यायालयाने उद्यापर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. वाळू तस्करीवर कारवाई करणाऱ्या टेंभुर्णीच्या प्रांत अधिकारी प्रियंका आंबेकर यांच्याशी हुज्जत घालून त्यांना धक्काबुक्की केल्याचा आरोप या तिघांवर आहे. याप्रकरणी आणखी तीन अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेनं २०२४करता सर्वोत्कृष्ट खेळाडूंची नावं जाहीर केली. भारताचा जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमरा याला सर्वोत्कृष्ट कसोटीपटू तर महिला क्रिकेटमधे डावखुरी फलंदाज स्मृती मानधना हिला

एकदिवसीय सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून स्थान मिळालं आहे. पुरुषांच्या टी ट्वेंटी क्रिकेटमधे अर्शदीप सिंग सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला आहे.

जसप्रीत बुमराने गेल्या वर्षभरात १३ कसोटी सामन्यात ३५७ षटकात ७१ बळी मिळवले. भेदक यार्करचा मारा आणि सातत्यपूर्ण खेळ ही त्याच्या यंदाच्या कामगिरीची वैशिष्ट्यं ठरली.

स्मृती मानधना ने गेल्या वर्षभरात १३ एकदिवसीय सामन्यांमधे मिळून ७४७ धावा करुन विक्रमाची नोंद केली. यात ४ शतकी खेळी होत्या. हा देखील महिला क्रिकेटमधला विक्रम आहे. तिच्या एकूण कारकिर्दीतल्या २४ सामन्यांमधे मिळून तिने यंदा १ हजार ३५८ धावा पूर्ण केल्या.

पुरुषांच्या क्रिकेटमधे एकदिवसीय आणि टी ट्वेंटी प्रकारातला सर्वोत्कृष्ट संघाचा मान भारतीय संघानं पटकावला आहे.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात कोकणात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. मराठवाडा आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किंचित वाढ झाली.

राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहमदनगर इथं १२ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, राज्यातल्या सर्व विभागांमधे हवामान कोरडं राहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><>//